# निवडणुक प्रचार अभियान डायरी- दि.25.04.2014

**अरुण जेटली**
(विरोधी पक्षनेते, राज्यसभा)

वाराणसीत नरेंद्र मोदी यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला त्याआधी आयोजित करण्यात आलेल्या रोड शो ला जनसागर उसळला होता. याआधी सुद्धा असाच रोड शो पाहायला मिळाला होता. इतकी अभुतपूर्व गर्दी कधीच एकत्र करता येणे शक्य नाही. ती स्वतःहून उसळली होती. मात्र राजकीय कार्यकर्त्यांना अशा कार्यक्रमांमध्ये भाग घेण्यास मनवू शकतो मीत्र जनतेला नाही. जनतेची गर्दी इतक्या विशाल प्रमाणात असेल तेव्हा स्वयंस्फूर्तीचे एक तत्व त्यात नेहमी असते.
पंतप्रधानांनी नुकतेच एक वक्तव्य केले होते की देशात मोदी यांच्या बाजूने कोणतीही लाट नाही. मोदींनी संपूर्ण भारतात 400 पेक्षा अधिक रॅलींना संबोधित केले आहे. त्यापैकी पाच रॅलींना मिळालेला अभुतपूर्व प्रतिसाद देशाची लाट कोणाच्या दिशेने आहे ते सूचवते. अजेंडा स्थापित करुन सुशासन आणण्याची मोदींची क्षमता स्पष्ट दिसत आहे. उत्तर,मध्य आणि पश्चिम भारतात भाजपला मोठा जनाधार मिळत असल्याचे पाहायला मिळाले. या विस्तारात मोदी लाट पाहायला मिळते. देशातील पूर्व आणि दक्षिण भागात भाजपच्या बाजूने मतदारांमध्ये महत्त्वपूर्ण वाढ झाली आहे.
तर दुसरीकडे गांधी परिवार संकटात आहे. निरोप घेत असलेल्या सरकारमधील नेत्यांकडून एक अभियान म्हणून स्वतःची सिद्धी जनतेला दाखविण्याऐवजी नकारात्मक दृष्टिकोन दाखविला जात आहे. देशात काँग्रेस-विरोधी मतप्रवाह चर्चेचा विषय ठरला आहे. शासक पक्ष विरोधी पक्षाला दोष देऊन स्वतःची असफलता लपविणे असा इतिहासच सांगतो. डॉ.मनमोहन सिंह हे अदूरदर्शी आहेत त्यामुळेच त्यांना मोदी लाट दिसत नाही आहे. मी ते पाहत आहे, परंतु ते कबूल करत करणार का? काँग्रेस आणि युपिए-विरोधी मतप्रवाह इतक्या मोठ्या संख्येने प्रथमच पाहत आहे. नेतृत्त्वाची निष्फळता त्यासाठी कारणीभुत आहे. ते निवडणुक प्रक्रियेसाठी जबाबदार आहेत. सरकार विरुद्ध जनाक्रोश आणि यादरम्यानची मोदी लाट भारतासाठी आशेचा किरण बनले आहे. कॉंग्रेस नेते असहाय जाणवत आहेत. चिदंबरम, सिब्बल, तिवारी, आनंद शर्मा हे कठोर आणि असभ्य शब्दात मोदी लाटे समोर प्रतिक्रिया दर्शवत आहेत.

-------------------------------------------------------------------------------------

**पंजाबमध्ये मोदी**

नरेंद्र मोदी पंजाबमध्ये पाच रॅलींना संबोधित करणार आहेत. मी निवडणुक प्रचार अभियानासाठी गुरदासपूर, भटींडा, होशियारपूर, लुधियाना आणि अमृतसर संसदीय मतविस्ताराची भेट घेतली. पंजाब गेमचेंजर बनत आहे आणि नरेंद्र मोदींची आतुरतापूर्वक वाट पाहण्यात येत आहे.